महाराष्ट्र शासन
**वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ वनवृत्त यवतमाळ यांचे कार्यालय**
**वनभवन, चर्च रोड, अप्सरा टॉकीज जवळ, सिव्हील लाईन्स, यवतमाळ**
महाराष्ट्र वन विभाग ०७२३२-२४२८९४ ०७२३२-२४२१९४ E-Mail ccftyavatmal@mahaforest.gov.in, conytlyvt@gmail.com

क्रमांक-वसं(य)/कक्ष-10/वनसंवर्धन/ 1229 /2022-23, यवतमाळ, दि. 24/02/2023.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपुर

**विषय:- मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि. नागपुर यांना जोडमोहा ते नांझा, पोटगव्हाण, डोंगरखर्डा (प्रजिमा) या रस्त्याच्या कडेने ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी यवतमाळ जिल्हयातील ०.०३९ हे. वनजमिन वळती करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) शासन पत्र क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३३३/फ-१०, दिनांक-१०/०१/२०२३
२) मा.अप्रमुवसं, तथा केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपुर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/यवतमाळ/आय.डी १२९७७/२६९२, दिनांक-१६/०१/२०२३
३) उपवनसंरक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र./उवसं(य)/कक्ष/सर्व्हे/१६०८, दिनांक-१६.०२.२०२

---ooo---

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये सदर प्रस्तावामध्ये १ ते ३ त्रटया असल्याचे संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे. संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये उपवनसंरक्षक, यवतमाळ यांनी सदर त्रटीची पुर्तता प्रकल्प यंत्रणेकडुन करुन घेऊन पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. तरी सदर त्रटी पुर्तता अहवाल खालीलप्रमाणे यासोबत सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | त्रटी | पुर्तता |
|---|---|---|
| १ | उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालामध्ये सदर प्रकरणी वनभंग झाला असल्याचे प्रमाणीत केले आहे. मात्र, प्रमाणपत्रामध्ये वनभंग झाला नसल्याचे प्रमाणीत केले आहे. तसेच, केंद्रस्थ अधिकारी यांनी वनभ्ंग झाला नसल्याबाबत नमूद केले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी वनभ्ंग झाला किंवा कसे ? याबाबत अधिक स्पष्टता करावी. | उपवनसंरक्षक, यवतमाळ यांच्या स्थळ पाहणी अहवालामध्ये वनभंग झाला असल्याचे अनावधानाने लिहिले गेले आहे, परंतु प्रत्यक्षात सदर क्षेत्राची पाहणी केली असता, सदर कामामध्ये वनभंग झालेला नाही असे उपवनसंरक्षक, यवतमाळ यांनी कळविले आहे. सोबत सुधारीत भाग-२ (Part-II) व नव्याने स्थळ निरीक्षण अहवाल Site Inspection Report जोडण्यात येत आहे. |
| २ | केंद्रस्थ अधिकारी यांनी वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे नांझा येथील ०.००९ हे. जमिनीचा वैधानिक दर्जा राखीव वने नमूद केला असुन, | मौझे नांझा गट क्र. १५६ क्षेत्र ०.००९ हे. जमिनीचा वैधानिक दर्जा हा अवर्गीकत वने (Unclass Forests) असुन, पुन्हा तपासणी केली असता सदर जमिनीचा दर्जा हा अवर्गीकत |

| | | |
|---|---|---|
| | उपवनसंरक्षक यानी ऑनलाईन पार्ट-२ मध्ये सदर जमिनीचा दर्जा "अवर्गीकत वने" (Unclassed Forest)" नमूद केला आहे. त्यामुळे सदर वनजमिनीचा वैधानिक दर्जा राखीव वने आहे की "अवर्गीकत वने" (Unclass Forest)" याबाबत माहिती सादर करावी. | वने (Unclass Forests)" आहे. मौजे नांझा गट क्र.१५६ ही जमिन वनसदश्य क्षेत्र आहे. यासोबत वनसदश्य क्षेत्राबाबतची माहिती जोडण्यात येत आहे. तसेच सदर क्षेत्राचे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ व कलम २० अंतर्गत राखीव वन घोषित झाले नाही. करीता सदर क्षेत्र अवर्गीकत वने (Unclass Forests) दर्शविण्यात आलेले आहे. |
| ३ | प्रस्तावामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी मौजे देवनाळा येथील कंपा क्र.३७० मधील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. परंतु KML File चे अवलोकन केले असता, वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेले क्षेत्रा मौजे, देवनाळा येथील कंपा क्र. ३७० व ३७३ मधील असल्याचे दिसुन येते. तसेच, KML File व नकाशा मध्ये वळतीकरणाच्या क्षेत्राच्या Longitude-Latitud मध्ये तफावत दिसुन येते. सबब, Kml File प नकाशा आवश्यक त्या सुधारणेसह सादर करणे आवश्यक आहे. | प्रस्तावामध्ये ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी मौजे देवनाळा येथील कक्ष क्र. ३७० मधील जमिन वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेली आहे. सदर ऑप्टीकल फायबर केबल लाईन ही फक्त कक्ष क्र. ३७० मधुनच जात आहे. त्यासंबंधी KML File मध्ये सुधारणा करुन यासोबत सादर करण्यात येत आहे. तसेच नकाशामध्ये वळतीकरणाच्या क्षेत्राचे सुधारीत Longitude Latitude दर्शविण्यात आले आहे. |

करीता माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर

सहपत्र :- वरीलप्रमाणे (पुर्तता अहवाल ३ प्रतीत)
सहपत्रासह

(यु. एम. फड)
**विभागीय वन अधिकारी (दक्षता)**
**यवतमाळ वनवृत्त.**

O/C 23/12/23

प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक, यवतमाळ वनविभाग, यवतमाळ यांना माहितीसाठी अग्रेषित.

**प्रतिलिपी**:- मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमीटेड, नागपुर यांना माहितीकरीता करीता अग्रेषित.